| MHNS180005752025 | **संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२२५/२०२५**<br>**सरकार वि. विजय राजाराम आहेर**<br><br>**निशाणी — १० लगत.** |
|---|---|

## न्यायनिर्णय

(निकाल घोषीत दिनांक ०७ फेब्रुवारी २०२६)

अभियोगपक्षाचे कथन व आरोपीचे निशाणी ९ प्रमाणे नोंदविण्यात आलेले प्रतिकथन व दोन्ही पक्षांचा युक्तिवाद, यानुसार खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले, त्यांचे सकारण न्यायनिर्णय मी खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने सिध्द केले काय की, आरोपी स्वत:च्या फायद्यासाठी व विकण्यासाठी विनापरवाना ९० मि.ली. क्षमतेच्या एकुण ३५ सिलबंद बाटल्या व एक कापडी पिशवी असा एकूण रक्कम रू.१,२४५/— चा मुद्देमाल बाळगतांना मिळून आला व त्याने महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला काय ? | **नकारार्थी.** |
| २. | अंतिम आदेश काय ? | **आरोपीस निर्दोष मुक्त केले.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ करिता :—**

२. फिर्यादी पक्षाने प्रस्तुतकामी पंच रामा संभाजी पवार (अ.सा.क्र.१) व मनोहर कृष्णा आहिरे (अ.सा.क्र.२) यांना तपासले आहे. पंच साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यात त्यांच्यासमोर कोणताही पंचनामा झाला नाही असे कथन केले आहे. साक्षीदारांच्या पुराव्यामध्ये अभियोगपक्षाने पंचनाम्यावरील साक्षीदारांची स्वाक्षरी शाबीत केली आहे. साक्षीदाराने पंचनाम्यातील मजकुर अमान्य केला आहे. अभियोगपक्षाने पटलावर इतर कोणताही पुरावा आरोपी विरूद्ध आणला

नाही. त्यामुळे साक्षीदारांसमक्ष जप्ती पंचनामा व घटनास्थळ पंचनामा तयार करण्यात आला व आरोपीच्या ताब्यातून दारू जप्त करण्यात आली, ही बाब संशयापलीकडे शाबीत होत नाही. त्यामुळे सदर पंच साक्षीदारांचा पुरावा या प्रकरणातील पंचनामा सिध्द करण्यास पुरेसा नाही. सबब, सदर प्रकरणातील पंचनामा शाबीत झालेला नाही.

३. अभियोगपक्षातर्फे इतर साक्षीदारांनी उपस्थित राहून अभियोगपक्षाच्या कथनास दुजोरा दिलेला नाही. तसेच, सदर मुद्येमालाचा नमुना रासायनीक प्रयोगशाळेत घेउन जाणा—या पोलीस कर्मचा—यांसही तपासलेले नाही. त्यामुळे सदर प्रकरणातील जप्त दारू आरोपीच्याच ताब्यातुन जप्त करण्यात आली, याबाबतचा कोणताही भक्कम पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच अभियोगपक्षाने रासायनिक पृथ्थकरणाचा अहवाल पटलावर दाखल केलेला नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेले द्रव्य हे दारू होती हे तथ्य संशयापलिकडे शाबीत होउ शकत नाही. सबब, केवळ पंच साक्षीदारांच्या पुराव्यावरून, आरोपीच्या ताब्यातुन सदर प्रकरणातील मुद्येमाल जप्त करण्यात आला, ही बाब संशयापलीकडे शाबीत झाली नाही. त्यामुळे, आरोपीविरूध्द कोणताही गुन्हा शाबीत होवू शकलेला नाही. सबब, मुद्दा क्र. १ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.२ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**—:: <u>आदेश</u> ::—**

०१. आरोपीची महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम कलम ६५(ई) मधील गुन्हयातून फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

०२. आरोपीचे बंधपत्र व जामीनकदबा रद्द करण्यात येत आहे.

०३. जप्त मुद्देमाल अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यासाठी पाठविण्यात यावा.

०४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) अन्वये आरोपीस रक्कम रू.१५,०००/— च्या जामीनावर सोडण्यात येते. सहा महिन्यानंतर आरोपीचा जामीन हा आपोआप रदद् होईल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

VISHWAJIT BIPINCHANDRA CHAVAN

Digitally signed by VISHWAJIT BIPINCHANDRA CHAVAN
Date: 2026.02.16 11:35:48 +0530

**( विश्वजीत बि.चव्हाण)**

दिनांक : ०७/०२/२०२६.
ठिकाण : कळवण.

सह न्यायदंडाधिकारी, प्र. वर्ग,
कळवण.